# बृहन्मुंबई महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य खाते

### जाहिरात

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी(MO), कंत्राटी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी (आयुष), कंत्राटी विशेष कार्य अधिकारी (प्रा.आ.से.स./एचबीटी), कंत्राटी परिचारीका, कंत्राटी औषधनिर्माता, कंत्राटी संगणक सहाय्यक, कंत्राटी बहूउद्देशीय कामगार यांची दि. 01.07.2025 ते 31.03.2027 या कालावधीत प्रथम सहा महिन्यांसाठी (179 दिवस) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याकरिता मा.महानगरपालिका आयुक्त यांची **क्र.MGC/F/5910/दि.25.03.2025** अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. त्याकरीता खालील पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता **दि.30.04.2025 सकाळी 11.00 ते दि.02.05.2025 संध्याकाळी 06.00** वाजेपर्यंत या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने गुगल फॉर्मव्दारे अर्ज मागविण्यात येत आहे. याची सविस्तर माहिती व अर्जाचा नमुना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर केवळ तीन दिवासांकरिता प्रदर्शित करण्यात येईल.

| अ.क्र | पदाचे नाव | गुगल फॉर्म |
|---|---|---|
| 1 | कंत्राटी वैद्यकीय अधिकारी | https://shorturl.at/eNGXm |
| 2 | कंत्राटी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी (आयुष) | |
| 3 | कंत्राटी विशेष कार्य अधिकारी (प्रा.आ.से.स./एचबीटी) | |
| 4 | कंत्राटी परिचारीका | |
| 5 | कंत्राटी औषधनिर्माता | |
| 6 | कंत्राटी संगणक सहाय्यक | |
| 7 | कंत्राटी बहूउद्देशीय कामगार | |

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | कामाचे स्वरूप | ठोक मानधन व वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| **1.** | **कंत्राटी वैद्यकीय अधिकारी (Medical Officer MBBS)** | 1) उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची (एम.बी.बी.एस.) पदवी असणे आवश्यक आहे.<br>2) उमेदवार महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल नोंदणीकृत असावा व नोंदणीचे नूतनीकरण केलेले असावे.<br>3) संगणक विषयक ज्ञान आवश्यक | 1) संबंधित वॉर्डचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, (वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी दवाखाना) आणि वैद्यकीय अधिकारी (MOH) यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणे.<br>2) कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदवणे आणि वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांना अनुपस्थिती कळवणे.<br>3) BMC द्वारे प्रदान केलेल्या TABS वरील ई-कन्सल्टेशननुसार रुग्णांची तपासणी करणे.<br>4) उपचार आणि पाठपुरावा करण्यासाठी रुग्णांचे मार्गदर्शन आणि समुपदेशन करणे.<br>5) आवश्यक असल्यास निदान तपासणीसाठी रुग्णांना रेफरल करणे.<br>6) दवाखान्यात पुरेसा औषधांचा साठा सुनिश्चित करणे. | **ठोक मानधन** :-<br>रु.90000/- प्रति महिना<br><br>**वयोमर्यादा:-**<br>दि.01.07.2025 रोजी 70 वयापेक्षा जास्त नसावे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | 7) शिफ्ट दरम्यान दवाखान्याचे एकूण प्रभारी MO i/c दवाखान्याच्या अनुपस्थितीत देयकांसाठी योग्य अधिकाऱ्यांकडे पाठवणे.<br>8) वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार वेळेवर अहवाल सादर करणे आणि रेकॉर्ड ठेवणे.<br>9) तुमच्या कामगिरीच्या आधारे उच्च अधिकाऱ्यांकडून कामाचे मूल्यांकन केले जाईल.<br>10) वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी/ वैद्यकीय आरोग्य अधिकारी द्वारे निर्देशित केलेले इतर कोणतेही काम करणे. | |
| **2.** | **कंत्राटी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी (आयुष)** | 1) उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची "(बी.ए.एम.एस)" पदवी असणे आवश्यक आहे.<br>2) उमेदवार बी.ए.एम.एस महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसन (MCIM) नोंदणीकृत असावा व नोंदणीचे नूतनीकरण केलेले असावे.<br>3) संगणक विषयक ज्ञान आवश्यक | 1) नियमित लसीकरण<br>2) आजाराचे सर्वेक्षण<br>3) समाज प्रबोधन, आरोग्य शिक्षण व जनजागृती<br>4) असंसर्गजन्य आजाराची तपासणी<br>5) आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यासोबत नेमून दिलेल्या जागी वस्तीपातळीवरील सर्व सेवा आरोग्य केंद्राप्रमाणे प्रदान करतील.<br>11)वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी/ वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याद्वारे निर्देशित केलेले इतर कोणतेही काम करणे. | **ठोक मानधन :-**<br>रु.42000/- प्रति महिना<br><br>**वयोमर्यादा:-**<br>दि.01.07.2025 रोजी 43 वयापेक्षा जास्त नसावे |
| **3.** | **कंत्राटी विशेष कार्य अधिकारी (OSD)** | 1) बृहन्मुंबई महानगरपालिकेतून निवृत्त मुख्य लिपिक प्रशासकीय अधिकारी किंवा सहप्रमुख कर्मचारी अधिकारी | 1) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे (पॉलिक्लिनिक व डायग्नॉस्टिक केंद्र) व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे क्लिनिक (HBT Clinic) अंतर्गत दवाखान्यांकरीता घेण्यात येणा-या वैद्यकीय अधिकारी, निम्न वैद्यकीय कर्मचारी, जी.एन.एम., औषधनिर्माता, डेटा एंट्री ऑपरेटर, बहुउद्देशीय कामगार व इत्यादी पदांच्या उमेदवारांच्या अर्जाची पडताळणी करणे, यादी तयार करणे, त्याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठांच्या मान्यतेस सादर करणे.<br>2) प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेश तयार करुन सक्षम अधिका-यांच्या स्वाक्षरीनंतर संबंधित निवड झालेल्या उमेदवारांना कळविणे व नियुक्तीची पुढील कार्यवाही करणे.<br>3) कंत्राटी पद्धतीने नियुक्त झालेल्या कर्मचारी यांना प्रथमतः ६ महिन्यांकरीता व त्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन, आवश्यकता भासल्यास पुढील ६ | **ठोक मानधन :-**<br>परिपत्रक क्र.प्रकअ /१२७/सर्व(एमएसए/१० ६१/दि.२२/०९/२०२२ अन्वये सेवा निवृती पूर्वी मिळत असलेले मूळ वेतन अधिक महागाई भत्ता वजा निवृती वेतन वजा महागाई भत्ता.<br><br>**वयोमर्यादा:-**<br>दि.01.07.2025 रोजी 65 वयापेक्षा जास्त नसावे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | महिन्यांकरीता नियुक्त करणे, त्यासाठी आवश्यक ते करारपत्र स्वीकारणे व करारपत्राची कार्यवाही करणे.<br>4) कंत्राटी उमेदवारांचे मानधन, प्रभाव्य अहवाल मागवून घेणे.<br>5) उपरोक्त नमूद दवाखान्यांकरीता लागणा-या इतर साहित्याची उपलब्धता करण्याची कार्यवाही करणे.<br>6) वेळोवेळी वरिष्ठांच्या आदेशानुसार इतर प्रशासकीय व आस्थापनीय कामकाज पार पाडणे व मागणीनुसार अहवाल वरिष्ठांना सादर करणे व बैठकीस उपस्थित राहणे. | |
| **4.** | **कंत्राटी परिचारिका (Staff Nurse)** | 1) उमेदवार मान्यताप्राप्त मंडळाची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा इयत्ता 12 वी (10+2) उत्तीर्ण झालेला असावा.<br>2) उमेदवार जनरल नर्सिंग आणि मिडवायफरी (General Nursing and Midwifery) यांचा 3 किंवा 3½ वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण उत्तीर्ण झालेला असावा.<br>3) उमेदवार महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडून नोंदणीकृत असावा व नोंदणीचे नूतनीकरण केलेले असावे.<br>4) उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम 50 गुणांचा किंवा 100 गुणांचा (उच्चस्तर/निम्नस्तर) मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.<br>5) उमेदवार 'डीओईएससी' सोसायटीचे 'सीसीसी' किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' या स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाच्या 'एमएससीआयटी' किंवा 'जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा. | 1) दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी आणि बीएमसीच्या उच्च अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणे.<br>2) रुग्णांची नोंदणी आणि त्यांच्या आजारांची नोंद करणे.<br>3) टॅब सॉफ्टवेअरमधील डेटा राखणे.<br>4) आवश्यक असल्यास एचबीटीच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना तपासणी करताना मदत करणे (महिला रुग्ण असेल आणि एचबीटीचा वैद्यकीय अधिकारी पुरुष असेल तर अनिवार्य).<br>5) उपकरणांचे निर्जंतुकीकरण करणे.<br>6) सर्व उपकरणांचा डेड स्टॉक राखणे आणि क्लिनिकच्या दैनंदिन कामकाजात कोणतेही उपकरण हरवले जाणार नाही याची खात्री करणे.<br>7) रुग्णांचे मार्गदर्शन आणि समुपदेशन करणे.<br>8) एचबीटीच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितलेल्या वेळेनुसार तपासणीसाठी रक्त संकलन/रेखांकन.<br>9) निदान तपासणीसाठी मागणी फॉर्म भरणे आणि त्याची नोंद ठेवणे.<br>10) पॅथॉलॉजिकल नमुना संबंधित प्रयोगशाळेच्या प्रतिनिधीला सोपवणे आणि त्यासाठी अहवाल गोळा करणे.<br>11) एचबीटी रुग्णांची मलमपट्टी करणे.<br>12) एचबीटीच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितलेल्या वेळेनुसार रुग्णांना इंजेक्शन देणे.<br>13) एचबीटीच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेले इतर कोणतेही काम.<br>14) विहित नमुन्यात अहवाल संकलन आणि सादर करणे (ओडीके आणि ईमेल)<br>12) वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय | **ठोक मानधन**<br>रु.30000/- प्रति महिना<br><br>**वयोमर्यादा:-**<br>दि.01.07.2025 रोजी 43 वयापेक्षा जास्त नसावे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आरोग्य अधिकारी यांच्याद्वारे निर्देशित केलेले इतर कोणतेही काम करणे. | |
| **5.** | **कंत्राटी औषधनिर्माता (Pharmacist )** | 1) उमेदवाराकडे राज्य शासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाची फार्मसीमधील पदविका किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदविका किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची फार्मसीमधील पदवी असणे आवश्यक आहे. (पदवीस प्राधान्य देण्यात येईल.)<br>2) उमेदवार महाराष्ट्र राज्य फार्मसी कौन्सिलकडे नोंदणीकृत असावा व नोंदणीचे नूतनीकरण केलेले असावे.<br>3) संगणक विषयक ज्ञान उमेदवार डीओईएसीसी सोसायटीचे 'सीसीसी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एमएससीआयटी किंवा जीईसीटीचे प्रमाणपत्र धारक असावा.<br>4) उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम 50 गुणांचा किंवा 100 गुणांचा (उच्चस्तर/निम्नस्तर) मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा. | 1) दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी आणि बीएमसीच्या उच्च अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणे.<br>2) वॉर्डच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांच्या दवाखान्यातून देण्यात आलेली औषधे इंडेंट करणे.<br>3) औषधांचा पुरवठा इष्टतम राखणे आणि सॉफ्टवेअरमध्ये औषधांचा साठा अपडेट करणे,सुनिश्चित करणे जेणेकरून औषधांचा वेळेवर इंडेंट करणे शक्य होईल.<br>4) लागू असलेल्या FIFO आणि FEFO च्या तत्त्वानुसार औषधांच्या दुकानाची व्यवस्था करणे आणि औषधांचे व्यवस्थापन करणे.<br>5) मार्गदर्शक तत्त्वांनुसार कालबाह्य झालेल्या औषधांची विल्हेवाट लावणे.<br>6) रुग्णांना औषधे आणि समुपदेशन (सेवन कसे करावे आणि औषधांचे दुष्परिणाम/करावे आणि करू नये) देणे.<br>7) टॅब सॉफ्टवेअरमधील डेटा राखणे.<br>8) अहवाल, रेकॉर्ड बुक राखणे आणि वैद्यकीय अधिकारी आणि उच्च अधिकाऱ्यांना अहवाल सादर करणे.<br>9) एचबीटीच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेले इतर कोणतेही कामे करणे. | **ठोक मानधन** :-<br>रु.20000/- प्रति महिना<br><br>**वयोमर्यादा:-**<br>दि.01.07.2025 रोजी 43 वयापेक्षा जास्त नसावे |
| **6.** | **कंत्राटी संगणक सहाय्यक (DEO)** | 1) उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>2) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षा १०० गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी विषय (उच्चस्तर / निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>3) उमेदवाराने संगणक वापराबाबतचे MS-CIT (3 महिने अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा असावा) शासन मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेमधून उत्तीर्ण केलेला असावा व याबाबतचे महाराष्ट्र राज्य शासनाचे प्रमाणपत्र | 1) पॉलीक्लिनिकमध्ये आलेल्या सर्व रुग्णांची सॉफ्टवेअरमध्ये डेटा एन्ट्री करणे.<br>2) जीएनएम आणि विशेषतज्ञांना दैनंदिन कामात मदत करणे.<br>3) एनयूएचएम डीईओ नसताना अहवालासाठी मदत करणे.<br>4) सर्व दैनिक, मासिक, तिमाही आणि वार्षिक अहवाल तयार करणे.<br>5) प्रशासकीय कामात मदत करणे.<br>6) आरोग्य विभाग, सल्लागार, इतर कर्मचाऱ्यांशी समन्वय आणि सहकार्य करणे.<br>7) एकूण दैनिक रुग्ण, सल्लागारांनी पाहिलेले रुग्ण, प्रयोगशाळेतील चाचण्या आणि निदान केंद्रांसाठी पाठवलेले रुग्ण यांचे रेकॉर्ड व्यवस्थापित आणि व्यवस्थित करणे. | **ठोक मानधन** :-<br>रु.18000/- प्रति महिना<br><br>**वयोमर्यादा:-**<br>दि.01.07.2025 रोजी 43 वयापेक्षा जास्त नसावे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | उमेदवाराकडे असणे अनिवार्य आहे.<br>4) उमेदवाराने मराठी 30 श.प्र.मि. व इंग्रजी 30 व 40 श.प्र.मि. टंकलेखन शासन मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेमधून उत्तीर्ण केलेला असावा व याबाबतचे महाराष्ट्र राज्य शासनाचे प्रमाणपत्र उमेदवाराकडे असणे अनिवार्य आहे. डेटा एन्ट्रीचा वेग कमीतकमी 8000 की डीप्रेशन्स इतका अवगत असावा.<br>5) एम.एस.वर्ड, एक्सेल व मुलभूत सांख्यिकिय तंत्राच्या संगणक प्रणालीची माहिती असावी. | 8) प्रयोगशाळा आणि निदान केंद्रातून अहवाल गोळा करण्यासाठी व्यवस्था आणि समन्वय साधणे.<br>9) सल्लागार, प्रयोगशाळेतील चाचण्या आणि निदान चाचण्यांसाठी बीजक तयार करणे.<br>10) आवक आणि जावक नोंदी राखणे.<br>11) वैद्यकीय अधिकारी किंवा सल्लागारांनी दिलेले इतर कोणतेही काम.<br>12) फार्मासिस्टशी समन्वय साधून पी आणि एल फॉर्म अपडेट करणे.<br>13) वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी/ वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याद्वारे निर्देशित केलेले इतर कोणतेही काम करणे. | |
| **7.** | **कंत्राटी बहूउद्देशीय कामगार (MPW)** | 1) 10 वी पास मराठी विषयासहित, एम.एस.सी.आय.टी (MS-CIT) उत्तीर्ण मुळ प्रमाणपत्रासहित.<br>2) उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम 50 गुणांचा किंवा 100 गुणांचा (उच्चस्तर/निम्नस्तर) मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा. | 1. दवाखाना उघडणे व बंद करणे.<br>2. सदर दवाखान्यात येणा-या रुग्णांना रांगेत बसविणे.<br>3. रुग्णांची नोंदणी टॅबव्दारे करणे.<br>4. विभागीय वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून दवाखान्यासाठी लागणारी औषधे, साधन सामुग्री, वैद्यकीय साहित्य इत्यादी घेऊन येणे.<br>5. विभागीय वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी / विभागीय वैद्यकीय अधिकारी यांच्या कार्यालयात अहवाल घेऊन जाणे अथवा त्यांच्या कार्यालयातून परिपत्रक इत्यादी घेऊन येणे.<br>6. वैद्यकीय अधिका-यांना व परिचारीका तसेच औषधनिर्माता यांना मदत करणे व त्यांनी सांगितलेली सर्व कामे करणे.<br>7. दवाखान्याची एकंदर स्वच्छता राखणे.<br>8. वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याद्वारे निर्देशित केलेले इतर कोणतेही काम करणे. | **ठोक मानधन** :-<br>रु.18000/- प्रति महिना<br><br>**वयोमर्यादा:-**<br>दि.01.07.2025 रोजी 43 वयापेक्षा जास्त नसावे |

उपरोक्त अर्हताधारण करण्या-या उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने गुगल फॉर्म दि.30.04.2025 सकाळी 11.00 ते दि.02.05.2025 संध्याकाळी 06.00 वाजेपर्यंत अर्ज भरावयाचे आहे तसेच आवश्यकतेप्रमाणे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी(MO), कंत्राटी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी (आयुष), कंत्राटी विशेष कार्य अधिकारी (प्रा.आ.से.स./एचबीटी), कंत्राटी परिचारीका, कंत्राटी औषधनिर्माता, कंत्राटी संगणक सहाय्यक, कंत्राटी बहूउद्देशीय कामगार यांना अर्ज भरलेल्या ई-मेलवर कळविण्यात येईल. दुरध्वनी वर कोणतेही माहिती कळविली जाणार नाही ई-मेलची खात्री करणे तसेच ई-मेल वेळोवेळी चेक करणे याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची असेल.

कंत्राटी वैद्यकीय अधिकारी(MO), कंत्राटी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी (आयुष), कंत्राटी विशेष कार्य अधिकारी (प्रा.आ.से.स./एचबीटी), कंत्राटी परिचारीका, कंत्राटी औषधनिर्माता, कंत्राटी संगणक सहाय्यक, कंत्राटी बहूउद्देशीय कामगार यांना

रिक्त पदानुसार व जसे-जसे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि पॉलिक्लिनीक व डायग्नोस्टिक केंद्र कार्यान्वीत करण्यात येतील त्यानुसार कागदपत्रांची पडताळणी व सापेक्ष नियुक्ती आदेश देण्यात येतील.ही नियुक्ती प्रथमतः 179 दिवसांची असेल जर उमेदवारांचे काम समाधानकारक असेल तर कंत्राटी तत्वावर पुनर्नियुक्ती करण्यात येईल.

**सही/-**

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**